## स्पे. दि. दा. क्र. ३२/२००७ मधील नि. क्र. १०८ खालील आदेश

## CNR : MHSN050014452007

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ४ ते ६ व ८ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडून करुन घेतलेले दि. ०२.०९.२००४ रोजीचे खरेदीपत्र क्र. २७८४ हा मूळ दस्त हजर करणेकरीता व प्रतिवादी क्र. ९ ला करुन दिलेला गहाण दस्त क्र. २७८५ या कामी हजर करणेकरीता दिलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वरील दोन्ही दस्त प्रतिवादींच्या ताब्यात आहेत. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर हक्कज्ञापनासाठी दाखल केलेला असल्यामुळे हे दोन्ही मूळ दस्त न्यायालयासमोर असणे आवश्यक आहे. त्यामुळे ते दस्त हजर करणेचे निर्देश प्रतिवादींना द्यावेत, म्हणून प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ने अर्जास विरोध करुन त्याचे म्हणणे निशाणी १११ वर दिले आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीचा अर्ज विहीत नमुन्यात नाही, अर्जावर वादीची सही नाही, अर्जासोबत शपथपत्र दिलेले नाही, तसेच प्रतिज्ञा नमुद केलेली नाही. त्यामुळे अर्ज चालण्यास पात्र नाही. पुढे प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे असे की, वादीने मागणी केलेले दस्त प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात नाहीत.

४. प्रतिवादी क्र. २, ३ व ५ यांनी अर्जास विरोध करुन त्यांचे म्हणणे याच अर्जावर दिले आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, वादीचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतुदीनुसार नाही. दि. ०२.०९.२००४ चे खरेदीपत्र बँकेस तारण दिलेले असल्यामुळे बँकेच्या ताब्यात आहे. हा दस्त प्रतिवादींच्या ताब्यात नाही. तसेच तारण गहाण दस्तही बँकेच्या ताब्यात आहे. तोही प्रतिवादींच्या ताब्यात नाही. त्यामुळे वादीने केलेला दस्त मागणीचा अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब तो रद्द व्हावा.

५. दोन्ही वकील गैरहजर. त्यामुळे युक्तीवाद नाही.

६. ज्या मूळ दस्तांची मागणी वादींनी प्रतिवादींकडून केलेली आहे, ते दोन्ही दस्त आपल्या कब्जात नाहीत, असे म्हणणे प्रतिवादींनी दिलेले आहे. त्यामुळे ते दस्त हजर करावेत, असे निर्देश प्रतिवादींना देता येणार नाहीत.

७. शिवाय प्रतिवादींनी घेतलेल्या हरकतीप्रमाणे, वादीने अर्जासोबत दिवाणी प्रक्रिया संहितेत अपेक्षित असलेला नोटीसचा नमुना दिलेला नाही. शिवाय अर्जाला प्रतिज्ञापत्र नाही, शपथपत्र नाही. त्यामुळेही अर्ज चालण्यास पात्र नाही, या प्रतिवादींच्या कथनात तथ्य दिसते.

८. वर नमुद केल्याप्रमाणे, मूळ दस्त प्रतिवादींच्या ताब्यात नसल्यामुळे तो हजर करावा असे निर्देश त्यांना देता येणार नाहीत. म्हणून पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

वादीने मूळ दस्त अभिलेखावर आणण्यासाठी योग्य ती पुढील कार्यवाही लवकरात लवकर करावी.

सही/–

इस्लामपूर. (श्रीमती सु. रा. पाटील)

दिनांक–१९.०६.२०१८ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर